# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले ▲ अंक : ११ गुरुवार, दि. २ ऑक्टोबर २०२५ । पाने : ४ + ६ पानी दसरा विशेषांक ▲अमळनेर किंमत : १ रु. Email - globalmahatej@gmail.com


### निवेदन

गुरुवार, दि. २ ऑक्टोबर २०२५ रोजी विजयादशमी अर्थात दसरा सणानिमित्त 'दै. ग्लोबल महातेज'च्या कार्यालयास सुटी राहील. त्यामुळे शुक्रवार, दि. ३ ऑक्टोबर २०२५ रोजी अंक प्रसिद्ध होणार नाही. वाचक, वितरक, जाहिरातदार, हितचिंतक यांनी नोंद घ्यावी. – संपादक

### दिनविशेष

०२ ऑक्टोबर

- रमाबाई रानडे यांनी पुणे सेवासदन संस्थेची स्थापना केली.
- पेरांबूर येथे इंटिग्रल कोच फॅक्टरी सुरू झाली.
- आरबीआयने महात्मा गांधींच्या जन्मशताब्दीनिमित्त महात्मा गांधींची प्रतिमा आणि स्वाक्षरी असलेल्या २, ५, १० आणि १०० रुपयांच्या नोटा जारी केल्या.

### गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

**स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा–जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा–तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!**

**जय भारत...!**

**जय स्वदेशी...!!**

# बसमध्ये सीट मिळवेल त्याची जागा; ज्येष्ठ, महिला, विद्यार्थिनींची परवड

## एसटी बसमध्ये 'महिला राखीव जागे'वर पुरुषच गाजवतात हक्क





(छायाचित्रे : रजनीकांत पाटील)

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : महामंडळाच्या एसटी बसमध्ये महिला, अपंग, विद्यार्थिनी आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी काही आसनांवर विशेष आरक्षण असल्याचे स्पष्टपणे लिहिलेले असते. मात्र, प्रत्यक्षात अंमलबजावणी होताना दिसत नाही. जो पहिला सीट पकडतो, तोच त्यावर बसतो. त्यामुळे महिला, अपंग, ज्येष्ठ नागरिक आणि विद्यार्थिनींना उभे राहून किंवा चालकाच्या केबिनजवळ बसून प्रवास करावा लागतो.

महामंडळाकडून महिला, ज्येष्ठ नागरिक, अपंग, स्वातंत्र्यसैनिक, आमदार, खासदार आणि विद्यार्थिनींसाठी आरक्षित जागा ठेवण्यात आल्या आहेत. हे आरक्षण साध्या बसमध्येही लागू आहे. मात्र, या आरक्षणाचा खऱ्या लाभार्थ्यांना फायदा होत नाही, असे वास्तव अमळनेर बसस्थानकातील विविध बस गाड्यांमध्ये दिसून आले. अनेक ज्येष्ठ नागरिक अक्षरशः चालकाजवळ बसून प्रवास करत होते. काहींनी तर पायऱ्यांजवळ व खाली मिळेल तेथे बैठक मारली होती. अनेक गाड्यांमध्ये अनेक महिला तथा रुग्णही जागा न मिळाल्याने उभे राहतात किंवा खाली बसतात. अनेकदा आरक्षित जागांवर तरुण वा जोडपी बसलेली असतात. वाद टाळण्यासाठी हक्कदार काहीही बोलत नाहीत, तर वाहकही त्यांना उठवत नाही. त्यामुळे आरक्षण केवळ कागदापुरते मर्यादित असल्याचे स्पष्ट दिसून आले. यावेळी प्रवासी कोळकर यांनी वाहकाकडे विचारणा करून उभ्या महिलांना त्यांच्या आरक्षित जागा देण्याची विनंती केली असता, वाहकाने "बस सुटण्यापूर्वीच सीट धरावी लागते" असा अजब सल्ला दिला.

**बसमधील तक्रार पुस्तिकाच गायब**

प्रत्येक बसमध्ये तक्रार पुस्तिका ठेवण्याचा नियम आहे. प्रवाशांनी तक्रार नोंदविल्यास वाहकाने ती पुस्तिका ड्यूटी संपल्यानंतर आगारप्रमुखांकडे जमा करायची असते. त्यानंतर तक्रारींचे निवारण होऊ शकते. मात्र, अनेक बसमध्ये तक्रार पुस्तिकाच उपलब्ध नसल्याचे दिसून आल्याने प्रवाशांनी आश्चर्य व्यक्त केले आहे.

**बेशिस्त पार्किंगचा त्रास**

अमळनेर बसस्थानक परिसरात बेशिस्त पार्किंगमुळे प्रवाशांना प्रचंड गैरसोय सहन करावी लागते. प्रवाशांना बसमध्ये चढण्यासाठी, तसेच जागा मिळविण्यासाठी अक्षरशः धावपळ करावी लागते. त्यामुळे बसस्थानकातील गोंधळ आणि गर्दी अधिकच वाढते.

**नियमांचे पालन व्हावे**

"बसमध्ये महिलांसाठी राखीव जागा आहे. परंतु ती मिळविण्यासाठी वाद घालावा लागतो. त्यापेक्षा जिथे जागा मिळेल तिथेच बसून प्रवास करावा लागतो. मोठ्या शहरांमध्ये आरक्षणाचे काटेकोर पालन होते; तसेच ग्रामीण भागातही व्हायला हवे," असे प्रवासी सुनंदा पाटील यांनी सांगितले.

### अमळनेर येथे आज श्री साईंचा पालखी उत्सव

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा :**

अमळनेर : येथील वाघ बिल्डिंग परिसरातील श्री साईबाबा मंदिरातून महोत्सव समितीतर्फे गुरुवारी (ता. २) सकाळी नऊला श्रींची पालखी निघणार आहे. गेल्या २८ वर्षांपासून ही परंपरा कायम आहे. दरवर्षी घटस्थापनेला किर्तन सप्ताहाची सुरूवात होते. काल्याच्या किर्तनाने सप्ताहाची सांगता होते. विजयादशमीला 'श्रीं'च्या पालखी उत्सवाचा कार्यक्रम आयोजीत करण्यात येतो. या कलशधारी महिलांचा मोठा सहभाग असतो. चाळीसगाव येथील प्रसिद्ध समर्थ बॅण्ड या पालखीचे उत्सवाचे खास वैशिष्ट्ये आहे. त्यांच्या मधुर गीतांवर भाविक मंत्रमुग्ध होतात. या पालखी सोहळ्याचा भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्री साईबाबा महोत्सव समितीतर्फे करण्यात आले आहे.

### मंगळेश्वरी भूमीमाता : सिद्धीदात्री हळद अर्चन



**श्री मंगळग्रह मंदिरात नवरात्रोत्सवानिमित्ताने सिद्धीदात्री हळद आर्चन देवीच्या स्वरूपात सजविलेली श्री मंगळेश्वरी भूमीमाता.**

**(छायाचित्र : नितेश बारी)**

### विनम्र आवाहन

नवरात्रोत्सवानिमित्त आपल्याकडील घट, आरास, पूजा–विधींची वैशिष्ट्यपूर्ण मांडणी त्यांचे फोटो तसेच नवरात्रोत्सवानिमित्त आपल्याकडील काही पारंपारिक, दीर्घकालीन प्रथा, व्रत–वैकल्ये, उपक्रम आदींचीही माहिती आम्हांस या **7711004040** व **7711004242** क्रमांकावर पाठवा.

*संपादक, दै. ग्लोबल महातेज*

### डिजिटल पत्राने कृपया अवश्य अभिप्राय द्या

एकेकाळी पोस्टल पत्रांचा प्रचंड बोलबाला होता. भावभावनांचे, निमंत्रणांचे, सुख– दुःखाच्या वार्तांचे, सर्व प्रकारच्या व्यवहारांची देवाण–घेवाण शक्यतो पोस्टल पत्रानेच होत होती ." माझ्या मामाचे पत्र हरवले " असे म्हणत बालपणाचा आनंद आणि सुखद अनुभव आपण सर्वांनीच घेतला आहे. आता मात्र ते मामाचे पत्र जणू कायमचेच हरवले आहे. या पार्श्वभूमीवरही आपण डिजिटल पत्राने अर्थात व्हॉट्सॲपने **ग्लोबल महातेज** मधील बातम्या व लेख यासंदर्भातील अभिप्राय कृपया अवश्य पाठवा. आमच्यासाठी ते मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरेल.

धन्यवाद .

# पेट्रोलचा वाढता भाव अन् पंपावर सुविधांचा अभाव

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : कोणत्याही प्रमाणीत पेट्रोल पंपावर वाहनात मोफत हवा भरण्याची सुविधा असते. मात्र, अमळनेर तालुक्यातील बहुतांश पेट्रोल पंपावर हवा भरण्याची मशीन फक्त नावालाच जिथे आहे. तिथे ते बंद अवस्थेतच दिसून येते. त्यामुळे सरकारचे निर्देश असतानाही ग्राहकांच्या वाहनांना पेट्रोलपंपावर हक्काची हवा मिळत नाही. ग्राहकही आपल्या हक्काबाबत कुठलीच विचारणा करत नसल्याने अनेक पेट्रोल पंप मालक ग्राहकांच्या सुविधांकडे कानाडोळा करत आहेत.

कोणत्याही पेट्रोल पंपावर ग्राहकांना काही सुविधा मोफत असतात. त्या सुविधांचा लाभ घेण्याचा ग्राहकांना हक्क असतो. मात्र, या सुविधांबद्दल सरकारकडून कुठलीही जनजागृती होत नाही. शहरातील पेट्रोल पंपाच्याजवळ चिखल व पाण्याचे डबके दिसून आले. पेट्रोल पंपावर येणाऱ्या ग्राहकांना पाण्याच्या चिखलात वाहन उभे करावी लागते. यामुळे मोठा त्रास सहन करावा लागत आहे. याशिवाय पेट्रोल पंपावर पिण्याच्या पाण्याची सुविधा नाही. स्वच्छतागृहांची सुविधाही मोफत असते, तीही उपलब्ध नाही. प्रथमोपचार साहित्य, फायर सेफ्टी डिवाइस धुळखात पडले आहेत. या अशा अनेक बाबींकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे.

हवा भरण्यासाठी सुविधांचा अभाव

पेट्रोल पंपावरही अशा कुठल्याही माहितीचे फलक नसतात. त्यामुळे ग्राहकांच्या अज्ञानाचा फायदा अनेक पेट्रोल पंप मालक घेत आहेत. शहरातील पेट्रोल पंपावर मोफत हवा भरून मिळत नाही. पेट्रोल पंपात वाहनात हवा भरण्याचे मशीन आहे. पण, मशीन मागील अनेक दिवसापासून नादुरुस्त आहे.

### टायरमध्ये हवा किती असावी ?

अमळनेर : चांगल्या मायलेजसाठी गाडीच्या टायरमधील योग्य हवेचा दाब अत्यंत महत्त्वाचा आहे. यामुळे इंधनाची बचत होते आणि टायरचे आयुष्य वाढते. टायरमध्ये सरसकट ४० पीएसआय हवा भरणे चुकीचे आहे. यामुळे टायर फुटण्याचा किंवा सस्पेन्शन खराब होण्याचा धोका वाढतो.

कमी हवेचे तोटे

**जास्त इंधन वापर :** कमी हवेमुळे टायरचे रस्त्यावरील घर्षण वाढते. ज्यामुळे इंजिनला जास्त ऊर्जा लागते आणि इंधन खर्च वाढतो.

**टायरचे नुकसान :** कमी दाबामुळे टायरच्या कडा लवकर झिजतात व टायरचे आयुष्य कमी होते.

**नियंत्रणाचा धोका :** कमी हवेमुळे गाडीचे नियंत्रण, विशेषतः वळणावर किंवा जास्त वेगात बिघडू शकते.

**जास्त हवेचे तोटे**

**असुविधाजनक प्रवास :** जास्त हवेमुळे खराब रस्त्यावर धक्के जास्त जाणवतात.

**ब्रेकिंगची अडचण :** जास्त फुगलेल्या टायरमुळे रस्त्यावरील पकड कमी होऊन ब्रेकिंगला जास्त वेळ लागतो.

**योग्य दाब कसा तपासावा ?**

प्रत्येक गाडीच्या मॉडेलनुसार टायरमधील योग्य हवेचा दाब मॅन्युअलमध्ये किंवा ड्रायव्हर सीटच्या दारावरील स्टिकरवर नमूद असतो.

# दसऱ्यापूर्वीच सोने, चांदीच्या दराने घेतली उसळी!

## उच्चांक मोडीत काढत केला नवा विक्रम स्थापन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



**अमळनेर** : नवरात्रोत्सवाचा प्रारंभ झाल्यापासून सोन्याच्या बाजारपेठेत सातत्याने सोने व चांदीच्या दरात वाढ होत आहे. ही वाढ कायम राहात दसऱ्याच्या पूर्वसंध्येलाही कायम राहून तिने आजवरचे सर्व उच्चांक मोडीत काढत नवा विक्रम स्थापन केला आहे. बुधवार, दि. १ ऑक्टोबर रोजी सकाळी बाजार उघडताच सोन्यात १ हजार २३६ रूपयांची वाढ झाली. तर चांदीच्या दरात १ हजार ३० रूपयांची वाढ झाल्याने चांदी १ लाख ५१ हजार ४१० रूपयांवर पोहोचून त्यांनी नवीन उच्चांक स्थापन केला.

सर्वत्र आर्थिक गोंधळाची पार्श्वभूमी व जागतिक अनिश्चितता यामुळे सोने आणि चांदीसारख्या धातूंकडे सुरक्षित गुंतवणुकीच्या हिशेबाने पाहणाऱ्यांची संख्या वाढल्याचे दिसत आहे. अमेरिकेतील शुल्क धोरणे, मध्य पूर्वेतील संघर्ष आणि मध्यवर्ती बँकांच्या व्याजदर धोरणावर सतत नजर ठेवली जाणे या सर्व घटकांमुळे गुंतवणुकदार सोने आणि चांदी खरेदीकडे मोठ्या प्रमाणावर वळले आहेत. यामुळेच सोने व चांदी यांच्या दरात दिवाळीपर्यंत तेजी कायम राहण्याचा अंदाज जाणकारांकडून वर्तविला जात आहे. बाजारपेठेत आज सकाळी बाजार उघडताच सोन्यात पुन्हा १ हजार २३६ रुपयांची वाढ नोंदविली गेली. ज्यामुळे सोने जीएसटीसह १ लाख २० हजार ९२२ रूपयांपर्यंत जाऊन पोहाचले. त्यामुळे सोने व चांदीने दरातील दीड लाखांचा टप्पा ओलांडल्यानंतरही दरवाढ कायम असल्याने ग्राहकांसह व्यावसायिकांमध्ये चलबिचलता आहे. तर गुंतवणुकदार बेरकी व मुत्सद्दीपणाने त्यांना शक्य तेवढी सोने व चांदीची खरेदी व विक्री करीत आहेत.


ग्लोबल महातेज

आजच...! आपली जाहिरात बुक करा

दैनिक ग्लोबल महातेज उपलब्ध करून देत आहे आपणास

' चमकण्याची ' तसेच आपली व्यक्तिगत, राजकीय, व्यावसायिक प्रसिद्धी जाहिरात रूपाने प्रचंड मोठ्या प्रमाणावर करण्याची सुवर्णसंधी...!





रोज साडेतीन हजार पेपरचा खप असलेले ब्रॉडशिट आकारातील चारही पाने रंगीत असलेले महाराष्ट्रातील एकमेव वृत्तपत्र ...!!

डिजिटल पेपरच्या सहाय्याने लाखो लोकांपर्यंत पोहोचणारा अफलातून पेपर...!!!

**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १) | पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) | अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) | पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) | 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) | 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) | 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) | ३ वर्षाखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) | शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) | लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) | उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

जाहिरात बुकिंगसाठी संपर्क

शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678

रजनीकांत पाटील : 87884 41234

वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.

# मसाला पान



## चित्रपटाची पूर्वप्रसिद्धी : मराठी सिनेसृष्टीतील कलाकारांचे अनुभव

चित्रपटाच्या यशात पूर्वप्रसिद्धीचा वाटा महत्त्वाचा असतो. मराठी सिनेसृष्टीतील काही दिग्गजांनी याबाबतचे त्यांचे अनुभव व्यक्त केले आहेत. त्यांच्या दृष्टिकोनातून पूर्वप्रसिद्धीचे महत्त्व आणि त्याचे बदलते स्वरूप यावर प्रकाश टाकणारा हा लेख.

**वर्षा उसगावकर :** नावीन्यपूर्ण प्रसिद्धीचा फायदा



मराठी चित्रपटसृष्टीत पूर्वप्रसिद्धीला एक वेगळी दिशा देण्याचे श्रेय वर्षा उसगावकर यांच्या पहिल्या चित्रपटाला जाते. ' गंमत-जंमत 'चे निर्माते सतीश कुलकर्णी आणि दिग्दर्शक सचिन पिळगावकर यांनी वर्षा यांना ' वंडरगर्ल ' ही उपाधी देऊन प्रसिद्धीचा नावीन्यपूर्ण प्रयोग केला. त्या काळात मराठी चित्रपटांच्या प्रसिद्धीचे स्वरूप ठरलेले होते. परंतु या चित्रपटाने वेगळा दृष्टिकोन स्वीकारला. वर्षा यांना केंद्रस्थानी ठेवत त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला हायलाइट केले गेले. याचा फायदा केवळ चित्रपटालाच नव्हे, तर वर्षा यांच्या करिअरलाही झाला. त्या म्हणतात, की मराठी चित्रपटांनी प्रसिद्धीकडे काळजीपूर्वक लक्ष देणे गरजेचे आहे. योग्य प्रसिद्धीमुळे चित्रपट प्रेक्षकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचतो.

**किशोरी शहाणे :** माध्यमांचा विस्तार आणि प्रसिद्धीची गरज



किशोरी शहाणे यांच्या मते- मराठी असो वा हिंदी कोणत्याही भाषेतील चित्रपटाच्या यशात प्रसिद्धीचा वाटा महत्त्वाचा आहे. त्यांनी ' प्रेम करूया खुल्लम खुल्ला ' या चित्रपटापासून आपल्या अभिनय कारकिर्दीला सुरूवात केली. त्या काळात मराठी अभिनेत्री स्वतंत्रपणे फोटोसेशन करत नसत. पण किशोरी यांच्यासह काही अभिनेत्रींनी ही प्रथा सुरू केली. आजच्या काळात प्रिंट मीडियापासून सोशल मीडियापर्यंत अनेक व्यासपीठे उपलब्ध आहेत. किशोरी यांचा सल्ला आहे, की कलाकार आणि निर्मात्यांनी या माध्यमांचा वापर करून चित्रपट आणि स्वतःची ओळख प्रेक्षकांपर्यंत पोहोचविण्यासाठी वेळ काढावा. प्रसिद्धी ही चित्रपटाच्या यशाची गुरुकिल्ली आहे.

**नेहा महाजन :** हल्ली मराठी चित्रपटांची संख्या वाढली आहे.



आपला चित्रपट प्रेक्षकांच्या चर्चेत राहावा, यासाठी प्रसिद्धी अत्यंत महत्त्वाची आहे, असे नेहा महाजन यांना वाटते. नव्या पिढीतील कलाकारांना याची पूर्ण जाणीव आहे. त्यानुसार ते वृत्तपत्रे, वाहिन्या यांच्या कार्यालयांना भेटी देतात, पत्रकारांशी संवाद साधतात. यात निर्माते आणि दिग्दर्शकही सक्रिय सहभाग घेतात. नेहा यांचे निरीक्षण आहे, की काही वेळा प्रसिद्धी उत्तम झाली, तरी चित्रपट प्रेक्षकांना आवडेलच याची खात्री नसते. तरीही चित्रपटाला लक्षवेधी ठेवण्यासाठी माध्यमांचा वापर करणे अत्यावश्यक आहे.

**एन. चंद्रा :** उत्सुकता निर्माण करणे हेच यश



दिग्दर्शक एन. चंद्रा यांच्या मते- चित्रपटाच्या प्रसिद्धीचे यश त्यातून प्रेक्षकांमध्ये उत्सुकता निर्माण होण्यावर अवलंबून आहे. फक्त प्रदर्शनाची तारीख जाहीर करून उपयोग नाही. चित्रपटात काय खास आहे, हे प्रेक्षकांना जाणवले पाहिजे. मग तो चित्रपट दोन कोटींचा असो वा दोनशे कोटींचा. प्रेक्षकांमध्ये कुतूहल निर्माण झाले तरच प्रसिद्धी यशस्वी ठरते. यासाठी निर्माता, दिग्दर्शक आणि प्रसिद्धीप्रमुख यांनी एकत्रितपणे नियोजन करणे गरजेचे आहे. एन. चंद्रा म्हणतात, की प्रेक्षक घराबाहेर पडून चित्रपटगृहात आला, तरच प्रसिद्धी यशस्वी झाली असे म्हणता येते. त्यांच्या ' अंकुश 'पासून पुढील १५ चित्रपटांच्या अनुभवातून ते सांगतात, की पोस्टर डिझाईनपासून प्रत्येक बारीकसारीक गोष्टींकडे लक्ष देणे आवश्यक आहे. आजच्या काळात तर हे अधिकच महत्त्वाचे आहे.

मराठी चित्रपटसृष्टीतील या दिग्गजांच्या अनुभवांवरून हे स्पष्ट होते, की पूर्वप्रसिद्धी ही चित्रपटाच्या यशाची गुरुकिल्ली आहे. नावीन्यपूर्ण कल्पना, माध्यमांचा प्रभावी वापर आणि प्रेक्षकांमध्ये उत्सुकता निर्माण करणे यामुळे चित्रपट प्रेक्षकांपर्यंत पोहोचतो. बदलत्या काळानुसार प्रसिद्धीच्या पद्धती बदलल्या असल्या, तरी त्याचे महत्त्व कायम आहे. मराठी चित्रपटांनी याकडे विशेष लक्ष देऊन प्रेक्षकांशी जोडले जाणे आवश्यक आहे.

## महाराष्ट्र बनले कोट्यधीशांची राजधानी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : महाराष्ट्राने देशातील आघाडीचे संपत्ती निर्मिती केंद्र म्हणून आपली ओळख कायम राखली आहे. राज्यात एक लाख ७८ हजार सहाशे कोट्यधीश कुटुंबे आहेत. संपत्तीच्या जोरावर महाराष्ट्राने देशात पहिला क्रमांक पटकावला आहे. विशेषतः एकट्या मुंबईतच एक लाख ४२ हजार कोट्यधीश कुटुंबे आहेत, ज्यामुळे मुंबईला भारताची ' कोट्यधीशांची राजधानी ' म्हणून ओळखले जात आहे. ' मर्सिडीज-बेंझ हुरुन इंडिया वेल्थ रिपोर्ट 'नुसार २०२१ च्या तुलनेत महाराष्ट्रातील कोट्यधीश कुटुंबांच्या संख्येत १९४ टक्के वाढ झाली आहे. याच कालावधीत राज्याच्या संपत्तीतही १९४ टक्के वाढ नोंदविली गेली आहे. २०२०-२१ पासून राज्याच्या सकल देशांतर्गत उत्पादनात (जीएसडीपी) ५५ टक्के वाढ झाल्याने महाराष्ट्राच्या समृद्धीला आणखी बळकटी मिळाली आहे. संपूर्ण भारतात सध्या आठ लाख ७१ हजार ७०० कोट्यधीश कुटुंबे आहेत. त्यांची संपत्ती साडेआठ कोटी रुपये किंवा त्याहून अधिक आहे. देशभरात संपत्ती वाढत असली, तरी ती काही प्रमुख शहरांमध्ये केंद्रित आहे. मुंबईनंतर दिल्लीत ६८ हजार दोनशे आणि बेंगळुरूत एकतीस हजार ६०० कोट्यधीश कुटुंबे आहेत. ही तीन महानगरे भारतातील संपत्ती निर्मितीची सर्वांत मोठी केंद्रे आहेत. ' हुरुन इंडिया 'चे संस्थापक आणि मुख्य संशोधक अनस रहमान जुनैद यांच्या मते, एका दशकापेक्षा कमी कालावधीत एक दशलक्ष अमेरिकन डॉलर्सपेक्षा जास्त संपत्ती असलेल्या भारतीय कुटुंबांच्या संख्येत ४४५ टक्के वाढ झाली आहे. यातून संपत्ती निर्मिती समाजाच्या विस्तृत वर्गापर्यंत कशी पोहोचत आहे, हे स्पष्ट होते.

**टॉप टेन राज्ये :** संपत्तीबाबतीत महाराष्ट्रानंतर दिल्ली दुसऱ्या क्रमांकावर आहे, जिथे एकोणऐंशी हजार ८०० कोट्यधीश कुटुंबे आहेत. तमिळनाडू बहात्तर बजार ६०० कोट्यधीश कुटुंबांसह तिसऱ्या क्रमांकावर आहे. कर्नाटक (६८,८००), गुजरात (६८,३००), उत्तर प्रदेश (५७,७००), तेलंगणा (५१,७००), पश्चिम बंगाल (५०,४००), राजस्थान (३३,१००) आणि हरियाणा (३०,५००) यांचा अनुक्रमे पुढील क्रमांक लागतो.

## परिश्रम, प्रामाणिकतेशी तडजोड नको, तुमची स्वप्ने नक्कीच साकार...!



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

चित्रपट अभिनेते मोहनलाल यांना नुकतेच दादासाहेब फाळके पुरस्काराने गौरविले गेले. ते म्हणतात, की माझा नेहमीच असा विश्वास राहिला आहे, की चित्रपटनिर्मिती हा फक्त व्यवसाय नव्हे, तर ती एक जबाबदारी आहे. चित्रपटनिर्मिती ही केवळ तंत्रज्ञानाची किंवा मोठ्या बजेटची नाही ; ती सतत शिकण्याचा प्रवास आहे. मी दररोज स्वतःला आठवण करून देतो, की तुम्ही कितीही अनुभवी झालात तरी दररोज काहीतरी नवीन शिकत राहणे महत्त्वाचे आहे. ही सवय मला पुढे नेत राहते. मी माझ्या आयुष्याकडे असा विचार करून पाहतो, की प्रत्येक दिवस एक देणगी आहे. मला भूतकाळातील अपयशांवर लक्ष केंद्रित करायचे नाही किंवा भविष्याची चिंता करायची नाही. मी नेहमीच पूर्णपणे सच्चाईने जगण्याचा प्रयत्न करतो. मी यश आणि अपयश दोन्ही पाहिले आहे. खरे सांगायचे तर अपयशाने मला बरेच काही शिकविले आहे. अपयश आपल्याला थांबवत नाही, तर सुधारण्याची संधी देते. माझ्यासाठी यशाचा अर्थ कधीही फक्त पुरस्कार किंवा पैसा नव्हता. मला कोणतेही पुरस्कार किंवा टीका मिळाली, तरी मी नेहमीच दुसऱ्या दिवसाची सुरूवात नवीन उत्साहाने आणि नवीन शिकून करतो. माझ्यासाठी महानता पुरस्कारांमध्ये किंवा विक्रमांमध्ये नव्हे, तर मी इतरांच्या जीवनावर टाकू शकणाऱ्या सकारात्मक प्रभावात आहे. जर माझा प्रवास लोकांना शिकवत असेल, की साधेपणा, शिकत राहण्याची इच्छा आणि प्रामाणिकपणा हीच खरी ताकद आहे, तर मी माझे जीवन यशस्वी मानेन. जर मी माझे काम प्रामाणिकपणा आणि उत्कटतेने केले असेल, तर ती माझी सर्वांत मोठी कामगिरी आहे. हा विचार मला संतुलन आणि शांतता देतो. मी कधीही सुपरस्टार होण्याचे स्वप्न पाहिले नव्हते. माझे तत्त्वज्ञान नेहमीच मला मिळालेली प्रत्येक भूमिका पूर्ण प्रामाणिकपणे साकारण्याचे राहिले आहे. मला प्रत्येक चित्रपटातून, प्रत्येक भूमिकेतून काहीतरी नवीन शिकण्याची संधी मिळाली आहे. अभिनेता म्हणून मी नेहमीच माझ्या भूमिका प्रेक्षकांच्या हृदयाला स्पर्श करतील आणि संदेश देतील याची खात्री करण्यावर लक्ष केंद्रित करतो. खरा आनंद प्रसिद्धी किंवा नावात नाही. साधे आणि संतुलित जीवन जगण्यातून सर्वात मोठे समाधान मिळते. लोक मला अनेकदा विचारतात, की मी इतका यशस्वी असूनही साधा कसा राहतो ? माझे उत्तर नेहमी हेच असते, की साधेपणा ही जीवनाची खरी ताकद आहे. आपण साधेपणा राखला तर आपल्याला प्रत्येक क्षणाला आनंद मिळेल. हा साधेपणाच तुम्हाला मित्रांशी मनाने जोडण्यासाठी मदतशील करतो. आयुष्यातील हीच खरी संपत्ती आहे.

### उत्साहाने काम केल्यास यशस्वी

**कठोर परिश्रम आणि प्रामाणिकपणाशी कोणीही कधीही तडजोड करू नये. जर तुमचे काम सत्य आणि जोशाने केले तर यश नक्कीच मिळेल. जीवन हे फक्त मोठी ध्येये साध्य करण्यासाठी नाही, तर दैनंदिन जबाबदाऱ्या प्रामाणिकपणे पूर्ण करण्यासाठी आहे. लहान विजय एकत्रितपणे मोठी स्वप्ने सत्यात उतरवितात. मी अनुभवले आहे, की जेव्हा तुम्ही तुमच्या मार्गावर कठोर परिश्रम करत राहता तेव्हा जग नवीन संधींचे दरवाजे उघडते. खरी शक्ती प्रक्रियेवर विश्वास ठेवण्यामध्ये आणि सातत्य राखण्यात आहे.**

“ मी आयुष्यात यश आणि अपयश दोन्ही पाहिले आहे. अपयश आपल्याला थांबवत नाही, ते तुम्हाला सुधारण्याची संधी देते.

**– मोहनलाल (अभिनेता)**

## आशिया कप स्पर्धेत गोलंदाजांना जोरदार वाजविणाऱ्या अभिषेक शर्माच्या घरात आता वाजणार सनई चौघडा...

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**अमळनेर :** टीम इंडियाचा स्टार खेळाडू सलामीवीर अभिषेक शर्मा याच्या घरात लगीनघाई सुरू आहे. दोनच दिवसांत त्याच्या घरात सनई चौघडा वाजणार आहे. त्यामुळे घरात आनंदाचे वातावरण आहे. आशिया कपच्या फायनल सामन्यात टीम इंडियाने ५ विकेट राखून पाकिस्तानचा पराभव करत कप जिंकला. या विजयानंतर टीम इंडिया आता मायदेशी परतली आहे. अभिषेक आशिया कप घेऊन भारतात आल्याने त्याच्या घरात व मित्रमंडळीत आनंदाला उधाण आले आहे.

वाचक हो, तुम्हाला निश्चित असे वाटत असेल, की अभिषेकचे लग्न आहे. मात्र प्रत्यक्षात अभिषेक अजून खूप तरुण आहे. त्याने सर्व लक्ष फिटनेस आणि क्रिकेटवर केंद्रित केले आहे. त्यामुळे ' दिल-विल, प्यार-व्यार मैं क्या जानू रें...' ? अशीच अभिषेकची मानसिकता आहे. खरेतर अभिषेकच्या घरात त्याची बहीण कोमलच्या लग्नाची जोरदार तयारी सुरू आहे. त्याचे सर्व कुटुंब व आप्तेष्ट या लग्नाच्या तयारीत व्यस्त आहे. दरम्यान, भारताच्या विजयाबाबत बोलताना अभिषेक यांच्या आई म्हणाल्या, की घर आधीच उत्सवांनी भरलेले होते. त्यात आता अभिषेक आणि भारतीय संघाने विजय मिळवून त्यांच्या आयुष्यात आणखी आनंद भरला.



दरम्यान, भारताच्या या विजयानंतर कोलम शर्मा हिने न्यूज १८ इंडियाशी बातचीत केली आहे. यावेळी कोमल म्हणाली, की अभिषेकने मला विचारले, की मला लग्नाची कोणती भेट हवी आहे आणि मी म्हणाले की आशिया कपची ट्रॉफी आपल्या घरी आण. आणि अभिषेकने हे वचन पूर्ण केले आहे. मला माझ्या भावाचे सर्व सामने पाहायला आवडते आणि त्याच्या लग्नानंतरही मी त्याच्या सर्व सामने पाहत राहीन. मी आणि माझी आई शेवटच्या सामन्यासाठी दुबईत होतो. मात्र आम्ही स्टेडियमवर जाऊ शकलो नाही, याबद्दल मी थोडी निराश आहे. आमच्या संपूर्ण संघाने संपूर्ण देशाला एक उत्तम भेट दिली. आम्ही पाकिस्तानला हरवले आणि ट्रॉफी घरी आणली. ही बाब तर खूपच आनंदाची आणि अभिमानाची आहे. अनेक प्रश्नांना भारताने या विजयातून पाकिस्तानाला उत्तर दिले आहे. अभिषेकच्या आईने सांगितले, की जेव्हा जेव्हा मुलगा मोठी कामगिरी करतो तेव्हा ती आईसाठी खूप आनंदाची गोष्ट असते. अभिषेकची मेहनत पाहून मी आधीच भाकीत केले होते, की तो नक्कीच काहीतरी मोठे साध्य करेल. एकीकडे घरात लग्नाची तयारी आणि दुसरीकडे विजयाचा आनंद आणि अभिनंदन. याद्वारे जणू बाबाजींनी आपल्याला एकाच वेळी दोन मोठे आशीर्वाद दिले आहेत.

## दशहरा २०२५ : शिवलिंग से जुड़े ये विशेष उपाय दूर करेंगे सभी कष्ट

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दशहरा (विजयादशमी), जो इस साल २ अक्टूबर २०२५, गुरुवार को मनाया जाएगा, बुराई पर अच्छाई की जीत का प्रतीक है। इस पावन दिन भगवान राम ने रावण का वध किया था और मां दुर्गा ने महिषासुर का संहार किया था। यह दिन पूजा-पाठ और विशेष उपायों के लिए अत्यंत शुभ माना जाता है। खास तौर पर शिवलिंग से जुड़े कुछ उपाय आपके जीवन के कष्टों को दूर करने में मददगार हो सकते हैं।



**आइए जानते हैं ये उपाय :**

**१) बिल्व पत्र और गंगाजल से अभिषेक**

दशहरे के दिन शिवलिंग पर गंगाजल मिश्रित जल से अभिषेक करें। अभिषेक के दौरान 'ॐ नमः शिवाय' मंत्र का जाप करें। इसके बाद शिवलिंग पर कम से कम १० बिल्व पत्र अर्पित करें, जो रावण के दस शीशों का प्रतीक माने जाते हैं। मान्यता है कि बिल्व पत्र चढ़ाने से पाप और कष्ट दूर होते हैं।

**२) शमी पत्र अर्पण**

दशहरे पर शमी वृक्ष की पूजा का विशेष महत्व है। यदि आप कोर्ट-कचहरी के मामलों या शत्रुओं से परेशान हैं, तो शिवलिंग पर शमी पत्र अर्पित करें। यह उपाय शत्रु बाधा और कानूनी परेशानियों से मुक्ति दिलाने में सहायक माना जाता है।

**३. महामृत्युंजय मंत्र का जाप**

बीमारी, संकट या किसी बड़ी परेशानी से मुक्ति के लिए दशहरे के दिन शिवलिंग के सामने बैठकर 'महामृत्युंजय मंत्र' का कम से कम 108 बार जाप करें। यह मंत्र भगवान शिव के नीलकंठ स्वरूप का आव्हान करता है और सभी कष्टों को दूर करने में प्रभावी माना जाता है।

**४. चावल का दान**

यदि आप आर्थिक परेशानियों का सामना कर रहे हैं, तो दशहरे के दिन शिवलिंग के पास चावल रखें और बाद में उसे किसी गरीब को दान कर दें। इस उपाय से आर्थिक स्थिति में सुधार और स्थिरता आती है।

**५. दूध और शहद से अभिषेक**

नौकरी या व्यापार में उन्नति के लिए दशहरे के दिन शिवलिंग पर दूध और शहद मिलाकर अभिषेक करें। यह उपाय भगवान शिव की कृपा से कार्यक्षेत्र की बाधाओं को दूर करता है और सफलता दिलाता है।

## अजितदादा पवारांचा टोला : सोने स्त्रियांनाच शोभते, पुरुषांनी बैलासारखे साखळी घालू नये...



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

राजकारणात बहुतांश नेते आपल्या बोलण्याने कोणी दुखावू नये, आपल्या बोलण्याने राजकारणातील आपल्या स्थानावर परिणाम होऊ नये, यासाठी खूपच तोलून-मापून किंवा अगदीच सौम्य शब्दांत बोलतात. मात्र, स्पष्टवक्तेपणासाठ दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांच्यानंतर जे काही बोटावर मोजण्याइतपत नेते आहेत त्यात उपमुख्यमंत्री अजितदादा पवार खूपच अग्रेसर आहेत. भीती हा शब्द जणू त्यांच्या जीवनाच्या डिक्शनरीतच नाही. अत्यंत स्वाभिमानी, अभ्यासू व प्रचंड आवाका असलेल्या अजितदादांनी त्यांच्या शब्दरूपी बाणांनी अनेकांना घायाळ केले आहे. कुणी मला स्पष्टक्तता म्हणा की फटकळ म्हणा की आणखीन काहीही म्हणा मला जे काही अनुचित व अप्रिय वाटेल त्याबाबत मी स्पष्टपणे व थेट शब्दांत बोलणार म्हणजे बोलणार, अजितदादांनीच स्पष्ट केले आहे. अजितदादा यांनी चाकण (पुणे) येथील रांका ज्वेलर्सच्या उद्घाटनप्रसंगी भरपूर सोने घालून मिरविणाऱ्या कार्यकर्त्यांना थेट शब्दांत खोचक टोला लगावला. ते म्हणाले, की सोन्याचे दागिने स्त्रियांनाच शोभतात. पुरुषांनी उगाच गळ्यात जाडजूड साखळ्या घालून बैलासारखे दिसू नये. भारतीय संस्कृतीत सोन्याचे आकर्षण होते, आहे व राहील. आधुनिक काळात सोने खरेदीची क्षमता वाढली. मात्र सोने हे माता, पत्नी, बहीण, मुलींसाठी आहे. पुरुषांनी त्या भानगडीत पडू नये. सोन्याव[illegible] स्त्रीधन म्हणून पाहावे. सोने [illegible] ठेवून अडचणींवर मात करता येते. परंतु पुरुषांनी जाड साखळ्या घालून स्वतःला बैलासारखे सजवू नये. श्रीमंतीचे असे उधळमाप व खुले प्रदर्शन योग्य नाही.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# अमळनेरला भक्तीमय वातावरणात घट विसर्जन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर बुधवारी विविध नवरात्रोत्सव मंडळांतर्फे घट विसर्जन उत्साहात झाले. शहरातील ढेकू रोड, पिंपळे रोड, पाचपावली देवी मंदिर परिसर, बालाजी पुरा, तांबेपुरा, पैलाड आदी भागात नवरात्रोत्सव मंडळांनी देवीची स्थापना केली होती.

सकाळपासूनच अनेक मंडळांनी मिरवणूक काढून जल्लोषात घट विसर्जन केले. नवरात्रोत्सव मंडळांनी काढलेल्या सवाद्य मिरवणुकीत



महिलांनी गरब्याचा आनंद घेतला. यंदा बोरी नदी खळखळून वाहत असल्याने बोरी पात्रात विसर्जनासाठी मोठी गर्दी जमली होती. देवीची आरती करून विसर्जन शांततेत झाले.

# दसऱ्यानिमित्त अमळनेर बाजारात झेंडूच्या फुलांची विक्री वाढली

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : दसऱ्याच्या पार्श्वभूमीवर येथील बाजारपेठेत झेंडूच्या फुलांची विविध ठिकाणी दुकाने थाटली आहेत. फुले घेण्यासाठी बाजारपेठेत नागरिकांची मोठी गर्दी झाली. शहरातील विविध बाजारपेठांमध्ये मोठी आर्थिक उलाढाल होत आहे.

दसरा हा सण विजयादशमी म्हणून साजरा केला जातो. या दिवशी सोने-खरेदी, शस्त्रपूजन, सीमोल्लंघन अशा परंपरांबरोबरच एक महत्त्वाची प्रथा म्हणजे झेंडूच्या फुलांची सजावट. घराघरांत, वाहनांवर, देवघरात व व्यावसायिक आस्थापनांवर झेंडूच्या माळा लावून दसऱ्याचे स्वागत केले जाते. त्यामुळे अमळनेर शहरातील फुलांच्या बाजारात आज दिवसभर झेंडूच्या फुलांची खरेदी-विक्री गजबजलेली दिसली.

सकाळपासूनच शहरातील मुख्य बाजारपेठ, बसस्थानक परिसर, महाराणा प्रताप चौक, पाचपावली देवी मंदिर, तिरंगा चौक, मुख्य बाजारपेठ, दाणा बाजार, सराफ बाजार, लुल्ला मार्केट आदी भागात फुलविक्रेत्यांची गर्दी झाली होती. झेंडू, शेवंती, अबोली अशा फुलांच्या माळांनी बाजारपेठ उजळली होती. विशेषतः झेंडूच्या फुलांना प्रचंड मागणी असल्याने विक्रेत्यांच्या दुकानांवर ग्राहकांची रांग दिसत होती. दसऱ्याच्या आधीपासूनच शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात झेंडूची शेती केली होती. या पिकाला चांगला बाजारभाव मिळाल्याने शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधानाची लकेर उमटली आहे.विविध गावांमधून अमळनेर बाजारपेठेत झेंडूची आवक झाली. स्थानिक शेतकरी तसेच बाहेरील व्यापाऱ्यांनी झेंडूच्या फुलांच्या गाठोड्यांची विक्री केली. सकाळच्या सत्रात एका किलो झेंडूची किंमत ८० ते १०० रुपयांदरम्यान होती.



दुपारनंतर मागणी वाढल्याने दरांमध्ये वाढ होऊन काही ठिकाणी किलोमागे १२० रुपयेपर्यंत भाव मिळाला. काही ग्राहकांनी घरोघरी सजावटीसाठी मोठ्या प्रमाणावर झेंडूची फुले विकत घेतली, तर माळा तयार करणाऱ्या व्यावसायिकांना देखील आज भरगच्च उलाढाल झाली.



# विज्ञान परीक्षेचा उत्सव २१ शाळांमध्ये साजरा

## मारवड परिसर विकास मंच व मिल के चलो असोसिएशनचा संयुक्त उपक्रम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील मारवड परिसर विकास मंच व मिल के चलो असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने अमळनेर तालुक्यातील २० व धरणगाव तालुक्यातील एक अशा एकूण २१ शाळांमध्ये डॉ. कलाम फिरती प्रयोगशाळा हा उपक्रम सुरू आहे. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन वाढीस लागावा, तसेच भविष्यात बालवैज्ञानिक घडावेत, हा उद्देश ठेवून आयकर आयुक्त संदीपकुमार साळुंखे यांनी डॉ. कलाम फिरती प्रयोगशाळा या मोबाईल व्हॅनची संकल्पना पुढे आणली.

गेल्या वर्षी या उपक्रमांतर्गत १० शाळांची निवड करण्यात आली होती. त्यानंतर यावर्षी पुन्हा ११ शाळांची निवड करण्यात आली. त्यानुसार या विविध शाळांमधील विद्यार्थ्यांना विविध प्रयोगांच्या माध्यमातून विज्ञानाचे धडे देण्यात येत आहेत. आदिवासी विकास विभागाचे सहाय्यक आयुक्त कपिल पवार यांच्या उपस्थितीत परीक्षा घेण्यासंदर्भात विशेष बैठक यावेळी घेण्यात आली. त्यानुसार अध्ययन निष्पत्ती नेमकी कशी होत आहे, यासाठी या उपक्रमांतर्गत डॉ. कलाम विज्ञान संशोधन ही परीक्षा आज तालुक्यातील विविध शाळांमध्ये घेण्यात आली. या परीक्षेला सुमारे एक हजार ते अकराशे विद्यार्थी प्रविष्ठ झाले. तालुक्यातील विविध केंद्रांमध्ये केंद्र संचालक म्हणून जगदीश पाटील, डी. के. पाटील, आर. एस. पाटील, डी. ए. धनगर, निरंजन पेंढारे, उमेश काटे, देवेंद्र साळुंखे, जी. डी. पाटील, सुरेश वाडीले, ए. बी. धनगर, महेश पाटील, विजय मोरे, दत्तात्रय सोनवणे, मनोहर नेरकर, भूषण सोनवणे यांच्यासह मिलके चलो असोसिएशनचे अनिरुद्ध पाटील, विनायक पाटील, वैष्णवी ठाकरे, चेतन वैराळे, अतुल सैंदाणे, कल्याणी भोंडवे यांनी काम पाहिले.

दरम्यान, अमळनेर येथील विजयनाना पाटील आर्मी स्कूल अ‍ॅण्ड ज्युनिअर कॉलेजमध्ये प्राचार्य बी. डी. पाटील, केंद्र संचालक निरंजन पेंढारे, ज्येष्ठ विज्ञान शिक्षक एस. ए. बाविस्कर, उमेश काटे, के. एच. कोळी, संजय पाटील यांनी सहकार्य केले. तसेच सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयात प्राचार्य पी. एम. कोळी, अनिल पाटील, गोपाल हडपे, विजेंद्र गवळे, सुनील वाघ, दीपक पाटील, समाधान पाटील, नीलिमा पाटील, रूपाली पाटील, हर्षल बेहेरे आदींनी सहकार्य केले.

विज्ञान परीक्षेचा उत्सव झालेल्या शाळा विजयनाना पाटील आर्मी स्कूल, साने गुरुजी कन्या हायस्कूल, सावित्रीबाई फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय (सर्व अमळनेर), महात्मा जोतिराव फुले हायस्कूल (देवगाव देवळी), श्री दत्त माध्यमिक विद्यालय (पातोंडा), कै. आबासो. एस. एस. पाटील माध्यमिक विद्यालय (लोंढवे), शासकीय आदिवासी आश्रमशाळा (पिंगळवाडे), कै. श्रीराम गबाजीराव सोनवणे माध्यमिक विद्यालय (भरवस), शारदा माध्यमिक विद्यालय (कळमसरे), यशवंत माध्यमिक व उच्च माध्यमिक आदिवासी आश्रमशाळा (पिंपळे), पंडित नेहरू माध्यमिक विद्यालय (फापोरे), माता बिजासनी अनुसूचित आदिवासी आश्रमशाळा (अंतुर्ली), नंदादीप माध्यमिक विद्यालय (निंब), माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय (नगाव), सु. हि. मुंदडे हायस्कूल (मारवड), श्री. बी. बी. ठाकरे हायस्कूल (वावडे), माध्यमिक विद्यालय (टाकरखेडे), सर्वोदय माध्यमिक विद्यालय (कावपिंप्री), न्यू इंग्लिश स्कूल (डांगरी), आदर्श माध्यमिक विद्यालय (अमळगाव) यासह धरणगाव तालुक्यातील साळवा येथील इंग्रजी विद्यालयात परीक्षा घेण्यात आली.

### ६३ विद्यार्थ्यांची निवड होणार

डॉ. कलाम विज्ञान संशोधन परीक्षेत प्रत्येक शाळेतून तीन अशा २१ शाळांमधून ६३ विद्यार्थ्यांची निवड केली जाणार आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना २४ ऑक्टोबरला होणाऱ्या कार्यक्रमात सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना मारवड विकास मंचतर्फे नागपूर येथे शैक्षणिक अभ्यास दौऱ्याची मेजवानी मिळणार आहे.

# सहलीच्या नावाने नेले विद्यार्थ्यांना प्रार्थनास्थळी

## शिक्षण विभागाकडून पाच शिक्षकांवर निलंबनाची कारवाई

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : भुसावळ येथील सेंट अलॉयसीस हायस्कूलने विद्यार्थ्यांना सहलीच्या नावाने एका प्रार्थनास्थळी नेले होते. याप्रकरणी दाखल झालेल्या तक्रारीनुसार शिक्षण विभागाच्या त्रिसदस्यीय समितीने चौकशी केली. त्यानंतर दिलेल्या अहवालानुसार जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकाऱ्यांनी मुख्याध्यापिकेसह पाच शिक्षकांवर निलंबनाची कारवाई केली आहे. तसेच यासंदर्भात आठवडाभरात अहवाल द्यावा, असा आदेश संस्थेच्या अध्यक्षांना दिला आहे.

सेंट अलॉयसीस हायस्कूलने ११ सप्टेंबर रोजी इयत्ता नववीच्या स्काऊट गाईडच्या विद्यार्थ्यांना सहलीच्या नावाखाली एका प्रार्थनास्थळी नेले. यासंदर्भात शहरात वादंग निर्माण झाले. हिंदुत्ववादी संघटना, भाजपने मोर्चा काढून शाळेची मान्यता रद्द करावी, अशी मागणी केली. त्यानंतर माध्यमिक शिक्षण विभागाने तीन सदस्यीय समितीकडून चौकशी केली. या समितीने २६ सप्टेंबरला अहवाल सादर केला.

अहवालात मुलांना धर्माविषयीची पुस्तके दिल्याची नोंद

सहलीच्या संमती पत्रकात पूर्ण माहिती न देणे, विद्यार्थ्यांचे धर्मनिरपेक्ष वातावरण राखणे ही संविधानिक जबाबदारी न पाळणे, विद्यार्थिनींना प्रार्थनास्थळी नेताना स्कार्प बांधणे, आदी बाबींसह धर्माविषयी माहिती पुस्तक वाटप केल्याचे स्पष्ट झाले आहे. तसेच विद्यार्थ्यांना प्रार्थनास्थळी का नेले? याचे सबळ कारण शिक्षक व संस्थेला देता आले नाही.

### काय होते प्रकरण?

सेंट अलॉयसीस हायस्कूलने ११ सप्टेंबर रोजी शाळेतील विद्यार्थ्यांना सहलीला नेले. त्यात एका प्रार्थनास्थळी महिलांना प्रवेश निषिध्द असतानाही मुलींना स्कार्प (हिजाबप्रमाणे) व मुलांना डोक्यावर रुमाल बांधून प्रवेश देण्यात आला. यावर हिंदुत्ववादी संघटना, पालकांनी शाळेत जाऊन जाब विचारला. नंतर मोर्चा काढला होता.

### तीन शिक्षकांना मान्यताच नाही

दोषी आठ शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांपैकी शिक्षण विभागाची मान्यता नसलेल्या शिक्षणसेविका आफशीन इजलाल खान, कौलीनकौर हरप्रितसिंग नेब यांच्या निलंबनाची कारवाई संस्थेने त्यांच्या स्तरावर घ्यावी. तसेच संगणक शिक्षक गुरुजीतसिंग पदम यांच्या नियुक्तीबाबत अधिकृत पुरावे दिसत नसल्याचे याबाबत संस्थेने निर्णय घ्यावा, असे आदेशात नमूद केले आहे.

### असा आहे घटनाक्रम

- ११ सप्टेंबर : नववीच्या स्काऊट गाईड विद्यार्थ्यांना शैक्षणिक सहलीच्या नावाने प्रार्थनास्थळी नेले.
- १३ सप्टेंबर : पालक व हिंदुत्ववादी संघटनांनी शाळेत जाऊन मुख्याध्यापिका, शिक्षकांना जाब विचारला. तसेच शिक्षण विभागाला निवेदन दिले.
- १४ सप्टेंबर : शालेय प्रशासनाने पत्रकार परिषद घेऊन दिलगिरी व्यक्त केली.
- १५ सप्टेंबर : शिक्षण विभागाने त्रिसदस्यीय समिती नेमून चौकशीचे आदेश दिले.
- १६ सप्टेंबर : हिंदुत्ववादी व भाजपने मोर्चा काढून जाब विचारला.
- २६ सप्टेंबर : त्रिसदस्यीय समितीने शिक्षण विभागाला आपला अहवाल सादर केला.
- २९ सप्टेंबर : माध्यमिक शिक्षण विभागाने पाच शिक्षकांना संस्थेच्या अध्यक्षांनी निलंबित करण्याचे आदेश दिले.
- ३० सप्टेंबर : भुसावळ तालुका शिक्षण विभागाने हे आदेश शाळेला बजावले.



## तुम्हीच व्हा..! पत्रकार

अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

